सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्रमांक: ओएएस-०३२०/सीआर-२०/२०२०/तेवीस दिनांक:-११ ऑगस्ट, २०२१

## -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय:- ऑनलाईन अर्ज प्रणाली- उमेदवारांचे खाते अद्ययावत करण्याबाबत**
**संदर्भ:- दिनांक २७ मे, २०२१ रोजीचे प्रसिध्दीपत्रक**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीच्या संकेतस्थळामध्ये बदल करण्यात आला असून सद्यस्थितीत आयोगाची ऑनलाईन अर्जप्रणाली https://mpsconline.gov.in या संकेतस्थळावर स्थापित करण्यात आली आहे. तसेच, यापूर्वीच्या https://mahampsc.mahaonline.gov.in या संकेतस्थळावरील ऑनलाईन अर्जप्रणालीमधील उमेदवारांची खाती बंद करुन सदर खाती नवीन संकेतस्थळावर वर्ग करण्यात येत आहेत. सदर स्थानांतर लक्षात घेऊन उमेदवारांनी ऑनलाईन अर्जप्रणालीमधील त्यांच्या खात्याचा पासवर्ड व खात्यातील तपशील अद्ययावत करण्याबाबत आयोगाच्या दिनांक २७ मे, २०२१ रोजीच्या प्रसिध्दीपत्रकाद्वारे उमेदवारांना सूचना करण्यात आली होती. तथापि, अद्यापही बहुतांश उमेदवारांनी पासवर्ड व खात्यातील तपशील अद्ययावत केले नसल्याचे दिसून येते.

२. नजिकच्या काळात आयोगाकडील प्रलंबित भरतीप्रक्रियांच्या उर्वरित पुढील प्रक्रिया व नव्याने राबविण्यात येणा-या भरती प्रक्रियांकरीता अर्ज करण्यासाठी उमेदवारांची खाती अद्ययावत असणे आवश्यक आहे. खाती अद्ययावत असल्याशिवाय उमेदवारांना नवीन अर्ज सादर करणे शक्य होणार नाही, तसेच ऐनवेळी नवीन खाते तयार करणे अडचणीचे ठरण्याची शक्यता आहे. यास्तव, संबंधित उमेदवारांनी तातडीने आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीवरील त्यांच्या खात्याचा पासवर्ड व खात्यातील तपशील अद्ययावत करणे अनिवार्य आहे.

३. आयोगाच्या ऑनलाईन अर्जप्रणालीवर खाते अद्ययावत करताना खालीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे:-

(१) https://mpsconline.gov.in या नवीन ऑनलाईन अर्जप्रणालीच्या संकेतस्थळावरील ‘Registration’ मधील ‘Forgot/Reset Password’ या लिंकवर क्लिक करा.
(२) आपल्या जुन्या खात्याचा User Name, नोंदणीकृत Email Id, नोंदणीकृत Mobile Number यापैकी आपल्याला ज्ञात असलेला पर्याय निवडा व त्याप्रमाणे तपशील प्रविष्ट करुन ‘Get OTP’ या बटणावर क्लिक करा.
(३) आपल्या जुन्या खात्यामध्ये नोंदणीकृत असणा-या ईमेल आयडी व/अथवा मोबाईल क्रमांकावर प्राप्त होणारा OTP प्रविष्ट करुन सत्यापित करण्यासाठी ‘Verify’ बटणावर क्लिक करा.
(४) खात्यामध्ये नमूद केलेला आपला जन्मदिनांक नोंदवून ‘Submit’ बटणावर क्लिक करा.
(५) आपल्या पसंतीप्रमाणे ८ ते १५ वर्णांचा असा पासवर्ड प्रविष्ट करा की ज्यामध्ये किमान एक मोठे (Capital case), एक लहान (Small case), एक विशेष चिन्ह (Special character), एक अंक असावा.
(६) उपलब्ध होणा-या सहा सुरक्षा प्रश्नांची अचूक उत्तरे नमूद करुन ‘Reset’ बटणावर क्लिक करा.
(७) पासवर्ड बदलल्यानंतर सध्याचे युजर नेम कार्यान्वित राहणार नाही. नवीन ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे नोंदणीकृत ईमेल आयडी अथवा मोबाईल क्रमांक व नवीन पासवर्ड वापरुन लॉग इन करता येईल.

४. उपरोक्त विहित कार्यपध्दतीनुसार आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीवर खाते अद्ययावत करताना कोणत्याही प्रकारच्या तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यास आयोगाच्या १८००-१२३४-२७५ किंवा १८००-२६७३-८८९ या टोल फ्री क्रमांकावर अथवा support-online@mpsc.gov.in या ईमेल आयडीवर संपर्क साधता येईल.

५. खाते अद्ययावत करण्याच्या कार्यवाहीकरीता कोणतीही कालमर्यादा नाही. तथापि, विहित कालमर्यादेत करावयाच्या बाबींकरीता (उदा. परीक्षेचे प्रवेशप्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे, अर्ज करणे इत्यादी) ऐनवेळी होणारी गैरसोय टाळण्यासाठी शक्य तितक्या लवकर खाते अद्ययावत करणे उमेदवारांच्या हिताचे राहील.

सहसचिव, माहिती तंत्रज्ञान
महाराष्ट्र लोकसेवा आयोग